**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २१/२०१७-१८/ २७९ दिनांक: २५.०९.२०१७

## आदेश

**आदेश केस क्र. २१/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री सुरगोंडा जिनगोंडा पाटील<br>महादेव मंदीराजवळ पाटील गल्ली<br>मु.पो. निमशिरगांव ता. शिरोळ<br>जि. कोल्हापूर | **तक्रार**<br><br>**अर्जदार**<br>**(ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय जयसिंगपूर | |
| ४) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपाविभाग जयसिंगपूर | |

**कोरमः-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मी प्रदिप वि. खपली , सदस्य सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय देत आहे.

## ग्राहकांचे गा-हाणे

१) कृषी ग्राहक श्री सुरगोंडा जि. पाटील निमशिरंगाव यांचे नांवे ग्राहक क्र. शेती-२५२८२०८७३२३७ सदर तक्रारदार यांनी त्यांच्या मु.पो. महादेव मंदीराजवळ पाटील गल्ली निमशिरंगाव ता.शिरोळ , जि. कोल्हापूर येथील गट क्र.५२६ या जमिनीत कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी मिळण्यासाठी वि.प. यांच्याकडे रितसर अर्ज सादर करुन कोटेशन प्रमाणे दिनांक ०७.०७.२०१६ रोजी रक्कम रु. ६१९०/- जमा केली. तथापि, तक्रारदार यांना नियमानुसार विहीत मुदतीत वीज जोडणी मिळाली नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हापूर यांचेकडे दिनांक १२-०४-२०१७ रोजी तक्रार अर्ज दाखल केला. सदर कक्षाने दि. २०.०५.२०१७ रोजी निर्णय करुन, जेष्ठता यादीनुसार काम पूर्ण झाल्यानंतर कनेक्शन त्वरीत देण्यात यावे या केलेल्या आदेशाने समाधान न झाल्यामुळे तक्रारदार यांनी या मंचासमोर हे गा-हाणे दाखल केले आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

१) तक्रारदार यांना वीज जोडणी देण्यासाठी चार पोलची ०.२४ कि.मी. लघुदाबवाहिनी उभारावी लागणार आहे.सन-२०१६-१७ च्या प्रतिक्षायादीत त्यांचा १० वा क्रमांक आहे. तसेच सन-२०१४-१५ व सन २०१५-२०१६ ची कामे अद्यापपर्यन्त प्रलंबित आहेत. तक्रारदार यांना जेष्ठता यादीप्रमाणे वीज जोडणी देणेत येईल असे वितरण कंपनीच्या वतीने सांगण्यात आले.

२) सदर प्रकरणाची सुनावणी दि. २२.०९.२०१७ रोजी या मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार यांनी आपले, यांनी तोंडी युक्तिवाद केला. वि.प. यांचेतर्फे कार्यकारी अभियंता श्री मकरंद दे. आवळेकर , व उपकार्यकारी अभियंता श्री विष्णू कृ. माने यांनी तोंडी निवेदन केले. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचण्यात आली आहेत.

३) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना विशिष्ट कालमर्यादेत कृषी पंपासाठी नविन वीज जोडणी देणेबाबतचा वि.प. यांना आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तर:- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

४) तक्रारदार यांनी वि.प.कडे रितसर अर्ज सादर करुन मंजूर कोटेशनप्रमाणे जरुर ती रक्कम दिनांक ०७.०७.२०१६ रोजी वि.प.कडे भरणा केली याबद्दली वाद नाही. त्यांना तीन महिन्यात, नियमानुसार , वीज जोडणी देणेत आली नाही. त्यांना वीज जोडणी देण्यासाठी चार पोलची ०.२४ कि.मी. लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहे. सन-२०१६-१७ च्या प्रतिक्षायादीत आता तक्रारदार यांचा १० वा क्रमांक आहे. सन-२०१४-१५ व सन-२०१५-१६ ची प्रतिक्षायादीत ग्राहकांना अद्यापपर्यन्त वीज पुरवठा देण्यात आलेला नाही. तो दिलेनंतर तक्रारदार यांना वीज जोडणी देता येईल असे वि.प. तर्फे सांगणेत आले. निधी उपलब्ध झाल्यानंतर वीज जोडणी देता येणार आहे. आणि जेष्ठता यादी डावलता येणार नाही असेही वि.प.तर्फे सांगणेत आले.

५) तथापि, आम्ही वि . प. तर्फे केलेल्या युक्तिवादाशी सहमत होऊ शकत नाही. कृती मानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे जरुरीचे होते. कृतिमानके विनियम तसेच विद्युत कायदा २००३ चे कलम ४३ यापुढे जेष्ठता यादी, निधीची उपलब्धता नसणे या बाबी अत्यंत गौण ठरतात. विशिष्ट कालमर्यादेत वीज जोडणी देता आली नाही. तर कलम ४३ प्रमाणे दंडात्मक कारवाई आणि कृतिमानके विनियमानुसार विलंबाची भरपाई देण्याची वि.प. यांचेवर जबाबदार पडू शकते. जेष्ठता यादी किंवा प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य ही तत्वे योग्य असली तरी कायद्यांतील कठोर तरतुदीमुळे त्यांना फारसे महत्व देता येत नाही. त्यामुळे तक्रारदार हे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी मिळण्यास पात्र आहेत. असे आमचे निष्कर्ष आहेत.

**आदेश**

१) तक्रारदार श्री सुरगोंडा जिनगोंडा पाटील मु.पो. निमशिरगांव ता. शिरोळ जि. कोल्हापूर यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी नविन वीज जोडणी दि. २२-१२-२०१७ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश करणेत येतो.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / ~~बहुमताच्या~~ आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

25/9/2017

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव